# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

विषय: गुरूवार, दि.२१.०८.२०२५ रोजी होणा-या बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीकरिता मतदान करण्यासाठी बँकेचे सभासद असलेल्या महानगरपालिका कर्मचा-यांना कार्यालयीन वेळेत सवलत मिळणेबाबत.

मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उप- निबंधक, सहकारी संस्था, मुंबई -१ (शहर) यांनी साल २०२५ ते २०३० या कालावधीचा बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केलेला असून सदर कार्यक्रमानुसार गुरूवार, दि.२१.०८.२०२५ रोजी सकाळी ९.०० वा. ते सायंकाळी ५.०० वा. ही मतदानाची वेळ निश्चित केली आहे. दि.२१.०८.२०२५ हा कार्यालयीन कामकाजाचा दिवस असल्याने महानगरपालिका कर्मचा-यांना कार्यालयीन वेळेत योग्य ती सवलत देण्याची तसेच सभासदांना कार्यालयात येताना व कार्यालय सोडताना व बायोमेट्रिक्स मशिनमध्ये नोंद करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे कार्यालयात येताना किंवा कार्यालय सोडताना २ तासांची/त्याचप्रमाणे ज्या सभासदांची कार्यालये शहराच्या बाहेर (Outside City Division) आहेत त्यांना त्या दिवशी सकाळी अथवा दुपारी अर्ध्या दिवसाची सवलत दि.२१.०८.२०२५ रोजी बायोमेट्रिक्स मशिनमध्ये अंतर्भूत करण्याची तसेच जे महानगरपालिका कर्मचारी, बँकेचे सभासद मतदार आहेत त्यांना त्यांच्या मतदान केंद्रांजवळील महानगरपालिका आस्थापना विभागात बायोमेट्रिक्स मशिनमध्ये हजेरीची नोंद करण्यास, मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या क्र. एमजीसी/एफ/७३९४ दि.०७.०८.२०२५ रोजीच्या मंजुरीन्वये परवानगी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| सही/- १८. ०८.२०२५ | सही/- १८. ०८.२०२५ |
| (शारदा शा.गोसावी) | (श्री.किशोर गांधी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) |

महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय,
क्रमांक:प्रकअ/१९१/सर्वसा/एमओपी/२२४)
दिनांक: १८/०८/२०२५

प्रत------------------------------------------------------यांना(जादा----------- प्रतीसह)
माहितीकरिता व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता कृपया अग्रेषित.

L.L.Cardoza 18/8/25

(लिआना लॉ.कार्डोझ )
प्रशासकीय अधिकारी (आयुक्त)
महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय

18/8/2025